Test Booklet Code &No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**C**

# Paper-III
# PHILOSOPHY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ...........................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAY - 12316

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# PHILOSOPHY
## Paper III
# दर्शनशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Question Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. According to Nyāya , substance is :
   - (A) the collection of qualities
   - (B) unintelligible without the qualities
   - (C) dependent upon the qualities
   - (D) substratum of the qualities and actions

2. Identify the pair of sceptics :
   - (A) Ayer and Descartes
   - (B) Hume and Ayer
   - (C) Plato and Descartes
   - (D) Hume and Descartes

1. न्यायमतानुसार द्रव्य म्हणजे :
   - (A) गुणांचा समुदाय
   - (B) गुणांशिवाय अनाकलनीय
   - (C) गुणांवर अवलंबित
   - (D) गुणांचे आणि कर्माचे अधिष्ठान

2. संशयवादी विचारवंतांची जोडी ओळखा :
   - (A) एयर व देकार्त
   - (B) ह्यूम व एयर
   - (C) प्लेटो व देकार्त
   - (D) ह्यूम व देकार्त

3. Rights are intimately related to :

(A) Constitution

(B) Thinking

(C) State

(D) Duties

4. According to Zarathushtra, God has these many powers :

(A) Two

(B) Seven

(C) Eight

(D) Six

3. हक्क हे ............................ अतिशय जवळून संबंधित असतात.

(A) संविधानाशी

(B) विचाराशी

(C) राज्याशी

(D) कर्तव्यांशी

4. झरथुष्ट्रांच्या मते ईश्वराजवळ इतक्या पवित्र शक्ती आहेत :

(A) दोन

(B) सात

(C) आठ

(D) सहा

5. Which one of the following is *not* a component of parārthānumāna according to Nyāya ?

(A) Upanaya

(B) Udāharaṇa

(C) Tarka

(D) Hetu

6. Eudaemonism as the ideal of human life intends the practice of :

(*i*) Habitual performance of virtue

(*ii*) Dialogue with others

(*iii*) The Golden Mean

(*iv*) Hedonistic pursuits

Select the *correct* answer :

(A) (*i*) and (*ii*)

(B) (*i*) and (*iv*)

(C) (*ii*) and (*iii*)

(D) (*i*) and (*iii*)

5. न्यायमतानुसार पुढीलपैकी कोणता घटक परार्थानुमानाचा अवयव **नाही** ?

(A) उपनय

(B) उदाहरण

(C) तर्क

(D) हेतू

6. ॲरिस्टॉटलच्या युडेमोनिझममध्ये मानवी-जीवनाचे परमसाध्य मांडताना काय कारणे अपेक्षित आहे ?

(*i*) सद्‌गुणांचे सवयीने होणारे पालन

(*ii*) इतरांशी संवाद

(*iii*) सुवर्णमध्य

(*iv*) सुखांचा पाठपुरावा

**योग्य** उत्तर निवडा :

(A) (*i*) व (*ii*)

(B) (*i*) व (*iv*)

(C) (*ii*) व (*iii*)

(D) (*i*) व (*iii*)

7. Naiyayikas accept the following theory of error :

(A) Asat-khyāti

(B) Sat-khyāti

(C) Ātma-khyāti

(D) Anyathā-khyāti

8. The statement form which is *not* a contingent is :

(A) $p \supset p$

(B) $\sim(p \cdot q)$

(C) $p \supset q$

(D) $p \vee p$

7. नैयायिक खालील ख्यातिवाद स्वीकारतात :

(A) असत्ख्याती

(B) सत्ख्याती

(C) आत्मख्याती

(D) अन्यथा–ख्याती

8. जो विधानबंध नैमित्तिकतया सत्यासत्य नाही तो आहे :

(A) $p \supset p$

(B) $\sim(p \cdot q)$

(C) $p \supset q$

(D) $p \vee p$

9. According to Islam, 'Zakat' means Muslim has to :

(A) pay 10% of his wealth

(B) pay 2½ to 5% of his income for poor and needy

(C) pay 3% of his income

(D) pay 7% of his income

9. इस्लाम धर्मानुसार 'जकात' म्हणजे प्रत्येक मुसलमान व्यक्तीने :

(A) आपल्या संपत्तीपैकी 10% रक्कम देणे

(B) आपल्या उत्पन्नापैकी 2½ ते 5% हिस्सा गरीब आणि गरजूंसाठी देणे

(C) आपल्या उत्पन्नापैकी 3% हिस्सा देणे

(D) आपल्या उत्पन्नापैकी 7% हिस्सा देणे

10. The problem of induction is mainly about :

(A) Accepting induction

(B) Defining induction

(C) Justifying induction

(D) Falsifying induction

10. विगमनाची समस्या ही प्रामुख्याने याच्याशी संबंधित आहे :

(A) विगमनाच्या स्वीकाराशी

(B) विगमनाच्या व्याख्येशी

(C) विगमनाच्या समर्थनाशी

(D) विगमनाच्या असत्यीकरणाशी

11. Choose the *correct* combination :

(A) Sāmānyalaksana, jñānalaksana, Yogaja

(B) Sāmānyalaksana, jñānalaksana, Kevala

(C) Sāmānyalaksana, Kevala, Avadhi

(D) Sālokya, Sāmānyalaksana, Yogaja

12. "Fire is cold, because it has fireness." The inference commits the fallacy of :

(A) Viruddha

(B) Satpratipakṣa

(C) Bādhita

(D) Sādhāraṇa

11. **योग्य** समुच्चय निवडा :

(A) सामान्यलक्षण, ज्ञानलक्षण, योगज

(B) सामान्यलक्षण, ज्ञानलक्षण, केवल

(C) सामान्यलक्षण, केवल, अवधी

(D) सालोक्य, सामान्यलक्षण, योगज

12. "अग्नी शीतल आहे, कारण त्यात अग्नित्व आहे." या अनुमानातील हेत्वाभास आहे :

(A) विरुद्ध

(B) सत्प्रतिपक्ष

(C) बाधित

(D) साधारण

13. Match List I with List II and select the *correct* answer from the codes given below :

**List I (Thinker)**

(*a*) G. Frege

(*b*) B. Russell

(*c*) L. Wittgenstein

(*d*) W.V. Quine

**List II (Books)**

(*i*) From a Logical Point of View

(*ii*) Foundations of Arithmetic

(*iii*) The Blue and Brown Books

(*iv*) My Philosophical Development

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |

13. सूची I व सूची II यांच्या जोड्या लावून खाली दिलेल्या संकेतांकातील **योग्य** पर्याय निवडा :

**सूची I (तत्त्वज्ञ)**

(*a*) जी. फ्रेग

(*b*) बी. रसेल

(*c*) एल्. विट्गेन्स्टाइन

(*d*) डब्लू. व्ही. क्वाईन

**सूची II (ग्रंथ)**

(*i*) फ्रॉम लॉजिकल पाईंट ऑफ व्हू

(*ii*) फाऊंडेशन ऑफ अरिथमेटिक

(*iii*) द ब्लू अँड ब्राऊन बुक

(*iv*) माय फिलॉसॉफिकल डेव्हलप्मेंट

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |

14. Which of the following pairs of religion could be considered as 'non-theistic' ?
    (A) Judaism—Christianity
    (B) Islam—Zoraastrianism
    (C) Jainism—Buddhism
    (D) Hinduism—Sikhism

15. Which of the following view is *not* correct according to Vaiseṣika ?
    (A) Atoms are eternal
    (B) Compounds made of atoms are not eternal
    (C) All atoms are of the same kind
    (D) Atoms are known by inference

14. पुढीलपैकी धर्मांची कुठली जोडी निरीश्वरवादी म्हणता येईल ?
    (A) यहुदी—ख्रिश्चन
    (B) इस्लाम—पारशी
    (C) जैन—बौद्‌ध
    (D) हिंदू—शीख

15. वैशेषिक दर्शनानुसार पुढीलपैकी कोणते मत बरोबर **नाही** ?
    (A) परमाणू हे नित्य आहेत
    (B) परमाणूंपासून बनलेला संघात नित्य नसतो
    (C) सर्व परमाणू सारख्याच प्रकारचे असतात
    (D) परमाणूंचे ज्ञान अनुमान प्रमाणाने होते

16. Name the philosopher who is *not* phenomenologist :

(A) Brentano

(B) Meinong

(C) Husserl

(D) Quine

16. पुढीलपैकी मानसघटनावादी नसणारा तत्त्वचिंतक कोणता ?

(A) ब्रेन्टॅनो

(B) मायनाँग

(C) हुसर्ल

(D) क्वाईन

17. The view that Isvara is only nimitta kāraṇa of the world is upheld by :

(A) Nyāya system

(B) Vedanta system

(C) Jainism

(D) Mimāṁsā system

17. ईश्वर हे जगाचे फक्त निमित्त कारण आहे हे मत यांचे आहे :

(A) न्याय दर्शनाचे

(B) वेदान्त दर्शनाचे

(C) जैन दर्शनाचे

(D) मीमांसा दर्शनाचे

18. Find out the *correct* match :

(A) Contradiction $\sim(p \vee \sim p)$

(B) Rule of U.G. $\dfrac{\phi x}{\therefore (\exists x)\, \phi x}$

(C) Contingent $\sim(p \cdot \sim p)$

(D) Law of Distribution

$[p \vee (q \cdot r)] \equiv$

$[(p \vee q) \vee (p \vee r)]$

19. If the statement 'q' is true, the truth values of '$p \vee q$' and '$p \supset q$' are :

(A) both '$p \vee q$' and '$p \supset q$' are true

(B) both '$p \vee q$' and '$p \supset q$' are false

(C) '$p \vee q$' is false and '$p \supset q$' is true

(D) '$p \vee q$' is true and '$p \supset q$' is false

18. **योग्य** जोडी निवडा :

(A) व्याघात $\sim(p \vee \sim p)$

(B) सार्विक सामान्यीकरणाचा नियम

$\dfrac{\phi x}{\therefore (\exists x)\, \phi x}$

(C) नैमित्तिकतया सत्यासत्य $\sim(p \cdot \sim p)$

(D) वितरणाचा नियम

$[p \vee (q \cdot r)] \equiv$

$[(p \vee q) \vee (p \vee r)]$

19. जर 'q' हे विधान सत्य असेल तर '$p \vee q$' आणि '$p \supset q$' चे सत्यता-मूल्य हे असेल :

(A) दोन्ही '$p \vee q$' आणि '$p \supset q$' सत्य असतील

(B) दोन्ही '$p \vee q$' आणि '$p \supset q$' असत्य असतील

(C) '$p \vee q$' असत्य आणि '$p \supset q$' सत्य असेल

(D) '$p \vee q$' सत्य आणि '$p \supset q$' असत्य असेल

20. The total number of vows prescribed by Gandhiji for Satyāgrahi are :

(A) Five

(B) Nine

(C) Eleven

(D) Twenty one

20. गांधीजींनी सत्याग्रहींनी घेण्यासाठी एकूण व्रते सांगितली आहेत :

(A) पाच

(B) नऊ

(C) अकरा

(D) एकवीस

21. The most notable intuitionist of twentieth century is :

(A) Thomas Reid

(B) G.E. Moore

(C) A.J. Ayer

(D) Stevenson

21. विसाव्या शतकातील प्रख्यात अंत:प्रज्ञावादी म्हणजे :

(A) थॉमस रिड

(B) जी.इ. मूर

(C) ए.जे. एअर

(D) स्टीव्हन्सन

22. Every Axiomatic system must possess the following three characteristics :
    - (A) Consistency, non-contradiction, independence
    - (B) Consistency, independence, completeness
    - (C) Completeness, decision procedure, consistency
    - (D) Completeness, consistency, set theory

23. Which of the following indicate the theories of Punishment ?
    - (A) Preventive and Reactionary
    - (B) Reactionary and Reassuring
    - (C) Retributive and Reformative
    - (D) Reassuring and Retributive

22. प्रत्येक बीजानुमान पद्धतीने पुढील तीन वैशिष्ट्ये धारण केलेली असलीच पाहिजेत :
    - (A) सुसंगतता, न-व्याघाती, स्वतंत्रता
    - (B) सुसंगतता, स्वतंत्रता, संपूर्णता
    - (C) संपूर्णता, निर्णयपद्धती, सुसंगतता
    - (D) संपूर्णता, सुसंगतता, संच उपपत्ती

23. खालीलपैकी कोणत्या शिक्षाविषयक उपपत्ती आहेत ?
    - (A) प्रतिबंधात्मक व प्रतिक्रियात्मक
    - (B) प्रतिक्रियात्मक व आश्वासनात्मक
    - (C) प्रतिशोधात्मक व सुधारणात्मक
    - (D) आश्वासनात्मक व प्रतिशोधात्मक

24. Prābhākara and Bhātta differ on the following :

(A) Pramāna, Prameya, Dharma

(B) Pramāna, Prameya, Khyāti

(C) Pramāna, Khyāti, Dharma

(D) Prameya, Dharma, Khyāti

25. If the statement ‘p’ is false, the truth values of ‘p ⊃ q’ and ‘p · q’ are :

(A) both ‘p ⊃ q’ and ‘p · q’ are true

(B) both ‘p ⊃ q’ and ‘p · q’ are false

(C) ‘p ⊃ q’ is true and ‘p · q’ is false

(D) ‘p ⊃ q’ is false and ‘p · q’ is true

24. प्रभाकर आणि भट्ट यांच्यात पुढील मुद्द्यांवर भेद होते :

(A) प्रमाण, प्रमेय, धर्म

(B) प्रमाण, प्रमेय, ख्याती

(C) प्रमाण, ख्याती, धर्म

(D) प्रमेय, धर्म, ख्याती

25. जर ‘p’ हे विधान असत्य असेल तर ‘p ⊃ q’ आणि ‘p · q’ चे सत्यता-मूल्य असेल :

(A) ‘p ⊃ q’ आणि ‘p · q’ दोन्ही सत्य

(B) ‘p ⊃ q’ आणि ‘p · q’ दोन्ही असत्य

(C) ‘p ⊃ q’ सत्य आणि ‘p · q’ असत्य

(D) ‘p ⊃ q’ असत्य आणि ‘p · q’ सत्य

26. Find the *correct* sequence of Evolution :

(A) Prakṛti, Mahat, Tanmatras

(B) Prakṛti, Ahaṁkāra, Mahat

(C) Mahat, Ahaṁkāra, Prakṛti

(D) Prakṛti, Manas, Ahaṁkāra

27. Which of the following pairs is consistent ?

(A) Bādhita — Anupasaṁhāri

(B) Savyabhichāra — Anaikāntika

(C) Satpratipaksa — Svarūpāsiddha

(D) Viruddha — Sādhārana

26. उत्क्रांतीचा **योग्य** क्रम ओळखा :

(A) प्रकृती, महत्, तन्मात्रे

(B) प्रकृती, अहंकार, महत्

(C) महत्, अहंकार, प्रकृती

(D) प्रकृती, मनस्, अहंकार

27. खालीलपैकी कोणती जोडी सुसंगत आहे ?

(A) बाधित — अनुपसंहारी

(B) सव्यभिचार — अनैकांतिक

(C) सत्प्रतिपक्ष — स्वरूपासिद्ध

(D) विरुद्ध — साधारण

28. The view that language has one to one correspondence with reality is related to :

(A) Pragmatic theory of meaning

(B) Behaviourist theory of meaning

(C) Picture theory of meaning

(D) Use theory of meaning

29. The figure of a syllogism is determined by the position of .................. in the premises.

(A) Major Term

(B) Minor Term

(C) Middle Term

(D) Quantifier

28. भाषेचा वास्तवाशी (जगाशी) एकास एक संबंध असतो असे मत मांडणारी उपपत्ती हे आहे :

(A) अर्थाची फलप्रामाण्यवादी उपपत्ती

(B) अर्थाची वर्तनवादी उपपत्ती

(C) अर्थाची चित्र उपपत्ती

(D) अर्थाची उपयोगवादी उपपत्ती

29. संविधानाची आकृती आधारविधानांतील .................... याच्या स्थानांवरून निश्चित होते.

(A) साध्यपद

(B) पक्षपद

(C) मध्यपद

(D) संख्यापक

30. Which theory of punishment presumes the goodness of human beings ?

(A) Reformative theory of punishment

(B) Deterrent theory of punishment

(C) Retributive theory of punishment

(D) Preventive theory of punishment

31. Which among the following is *not* the Hetvābhāsa ?

(A) Bādhita

(B) Vyabhichāribhāva

(C) Asiddha

(D) Virudha

30. शिक्षेची कोणती उपपत्ती माणसातील चांगुलपणा गृहीत धरते ?

(A) शिक्षेची सुधारणात्मक उपपत्ती

(B) शिक्षेची प्रतिबंधात्मक उपपत्ती

(C) शिक्षेची प्रतिशोधात्मक उपपत्ती

(D) शिक्षेची निरोधात्मक उपपत्ती

31. खालीलपैकी कोणता हेत्वाभास **नाही** ?

(A) बाधित

(B) व्यभिचारीभाव

(C) असिद्ध

(D) विरुद्ध

32. The central principle of the ethical theory of Giligan is :

(A) Justice

(B) Care

(C) Love

(D) Utility

33. Facticity and Transcendence are regarded as the criteria of personal identity by :

(A) Nietzsche

(B) Heidegger

(C) Sartre

(D) Jaspers

34. The main objective of Mimāṁsā system is to establish the authority of the :

(A) Vedas

(B) Tripitakas

(C) Upaniṣadas

(D) Bhagwadgītā

32. गिलिगनच्या नैतिक उपपत्तीमधील मध्यवर्ती तत्त्व हे आहे :

(A) न्याय

(B) भावबंध

(C) प्रेम

(D) उपयोगिता

33. तथ्यात्मकता व अतीतता हे व्यक्तीच्या तदेवतेचे निकष कोणी मानले ?

(A) नित्शे

(B) हायडेगर

(C) सार्त्र

(D) यास्पर्स

34. मीमांसा दर्शनाचे मुख्य उद्दिष्ट होते ............................ प्रामाण्य प्रस्थापित करणे.

(A) वेदांचे

(B) त्रिपिटकांचे

(C) उपनिषदांचे

(D) भगवद्गीतेचे

35. The proposition in which the subject is distributed but the predicate *not* distributed is :

(A) I proposition

(B) A proposition

(C) E proposition

(D) O proposition

36. Which of the following is *not* a postulate of morality ?

(A) Uniformity of nature

(B) Free-will

(C) Immortality of soul

(D) Existence of God

35. ज्या विधानाचे उद्देश्यपद व्याप्त आणि विधेयपद अव्याप्त असते ते विधान असे आहे :

(A) I विधान

(B) A विधान

(C) E विधान

(D) O विधान

36. खालीलपैकी कोणते तत्त्व नीतीचे गृहीतक **नाही** ?

(A) निसर्गाची एकरूपता

(B) इच्छास्वातंत्र्य

(C) आत्म्याचे अमरत्व

(D) ईश्वराचे अस्तित्व

37. According to Russell, atoms are :

(A) Physical

(B) Spiritual

(C) Both of the above

(D) Neither physical nor spiritual

38. The view that '*Jāti*' is as much as real as the *Vyakti* is held by :

(A) Carvakas

(B) Naiyayikas

(C) Buddhists

(D) Saṁkhya

39. Which of the following schools does *not* accept inference and testimony as the valid sources of knowledge ?

(A) Buddhism

(B) Nyāya

(C) Cārvāka

(D) Saṁkhya

37. रसेलच्या मते अणू हे .................... असतात.

(A) भौतिक

(B) आध्यात्मिक

(C) हे दोन्ही

(D) भौतिक नसतात व आध्यात्मिकही नसतात

38. 'जाती' जेवढी सत् आहे तेवढीच 'व्यक्ती' ही सत् आहे हे मत यांचे आहे :

(A) चार्वाकांचे

(B) नैयायिकांचे

(C) बौद्धांचे

(D) सांख्यांचे

39. पुढीलपैकी कोणत्या दर्शनाने अनुमान आणि शब्दप्रमाणाचा स्वीकार केला **नाही** ?

(A) बौद्ध

(B) न्याय

(C) चार्वाक

(D) सांख्य

40. Match List I with List II and select the *correct* answer from the codes given below :

**List I**

(*a*) Apohavāda
(*b*) Anvitābhidhānavāda
(*c*) Abhihitānvayavāda
(*d*) Anyathākhyātivāda

**List II**

(*i*) Baudha
(*ii*) Nyāya
(*iii*) Prābhākara
(*iv*) Bhātta

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |

41. Identify the *correct* pair :

(A) "Meditations" — Spinoza
(B) "Principia Mathematica" — Russell
(C) "Philosophical Investigations" — Moore
(D) "Syntactic Structures" — Ayer

40. सूची I व सूची II जुळवून खाली दिलेल्या संकेतांकातून **योग्य** संकेतांक निवडा :

**सूची I**

(*a*) अपोहवाद
(*b*) अन्विताभिधानवाद
(*c*) अभिहितान्वयवाद
(*d*) अन्यथाख्यातिवाद

**सूची II**

(*i*) बौद्ध
(*ii*) न्याय
(*iii*) प्रभाकर
(*iv*) भट्ट

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |

41. **अचूक** जोडी ओळखा :

(A) मेडिटेशन्स – स्पिनोझा
(B) प्रिन्सिपिआ मॅथेमॅटिका – रसेल
(C) फिलॉसॉफिकल इन्वेस्टिगेशन्स – मूर
(D) सिन्टॅक्टिक स्ट्रक्चर्स – एयर

42. Which of the following is *true* ?
   (*i*) Nominalism regards universals as merely names
   (*ii*) Conceptualism regards universals as merely concepts
   (*iii*) According to Socrates, universals exist in the world of their own
   (*iv*) According to Plato, universals are embodied through particulars

   Select the *correct* answer :

   (A) (*iii*) and (*iv*)

   (B) (*i*) and (*iii*)

   (C) (*i*) and (*ii*)

   (D) (*i*) and (*iv*)

43. According to A.J. Ayer ethical statements are :

   (A) Expressions of approval

   (B) Assertions

   (C) Expressions of emotions

   (D) Expressions of truth value

42. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?
   (*i*) नामवादाच्या मते, सामान्ये नाममात्र असतात
   (*ii*) संकल्पनावादाच्या मते, सामान्ये निव्वळ संकल्पनात्मक असतात
   (*iii*) सॉक्रेटिसच्या मते, सामान्ये आपल्या स्वतंत्र विश्वात अस्तित्वात असतात
   (*iv*) प्लेटोच्या मते, सामान्ये विशेषांद्वारा मूर्त स्वरूपात प्रकटतात

   **योग्य** उत्तर निवडा :

   (A) (*iii*) व (*iv*)

   (B) (*i*) व (*iii*)

   (C) (*i*) व (*ii*)

   (D) (*i*) व (*iv*)

43. ए.जे. एयरच्या मतानुसार नैतिक अवधारणे ही :

   (A) मान्यतांचे आविष्कार असतात

   (B) विधेयात्मक विधान असतात

   (C) भावनांचे आविष्कार असतात

   (D) सत्यतामूल्यांचे आविष्कार असतात

44. The principle of act utilitarianism is concerned with :

(A) The motive of an action

(B) Consequences of similar actions

(C) The character of the agent

(D) The consequence of actions

45. According to Bradley :

(*i*) Metaphysics is non-sensical

(*ii*) Metaphysics is the study of Being-qua-Being

(*iii*) Metaphysics deals with reality as against appearances

(*iv*) Metaphysics comprehends the universe not by fragments but as the whole

Select the *correct* answer :

(A) (*i*) and (*ii*)

(B) (*ii*) and (*iii*)

(C) (*i*) only

(D) (*iii*) and (*iv*)

44. कृती–उपयुक्ततावादाचे तत्त्व याच्याशी संबंधित आहे :

(A) कृतीच्या हेतूशी

(B) समान कृतींच्या परिणामांशी

(C) कर्त्याच्या चारित्र्याशी

(D) कृतीच्या परिणामांशी

45. ब्रॅडलीच्या मते :

(*i*) अतिभौतिकी अर्थशून्य आहे

(*ii*) अतिभौतिकी निखळ अस्तित्वाचा अभ्यास करते

(*iii*) अतिभौतिकी आभासांना छेद देत आभास व वास्तव यातील भेदाचा अभ्यास करते

(*iv*) अतिभौतिकीचे जगाचे आकलन खंडात्मक नसून समग्र असते

**योग्य** उत्तर निवडा :

(A) (*i*) व (*ii*)

(B) (*ii*) व (*iii*)

(C) (*i*) फक्त

(D) (*iii*) व (*iv*)

46. Match List I with List II and choose the *correct* answer from the codes given below :

**List I**

(*a*) Gilbert Ryle

(*b*) Kant

(*c*) Jeremy Bentham

(*d*) Ludwig Wittgenstein

**List II**

(*i*) Utilitarianism

(*ii*) Category mistake

(*iii*) Picture theory of meaning

(*iv*) Categorical imperative

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

46. सूची I व सूची II जुळवून खालील संकेतांकामधून **योग्य** उत्तर निवडा :

**सूची I**

(*a*) गिल्बर्ट राइल

(*b*) कांट

(*c*) जेरेमी बेंथम

(*d*) लुड्विंग विट्गेन्स्टाइन

**सूची II**

(*i*) उपयुक्ततावाद

(*ii*) प्रमाद-कोटी

(*iii*) अर्थाची चित्र उपपत्ती

(*iv*) निरुपाधिक आदेश

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

47. Who was the chief exponent of dvaitādvaitavāda ?

(A) Nimbārka

(B) Sankar

(C) Madhva

(D) Ramānuja

47. द्वैताद्वैतवादाचे मुख्य पुरस्कते कोण होते ?

(A) निम्बार्क

(B) शंकर

(C) मध्व

(D) रामानुज

48. The systems accepting both the pramānas, viz. pratyakṣa and upamāna are :

(A) Cārvāka and Nyāya

(B) Buddhists and Nyāya

(C) Yoga and Nyāya

(D) Pūrva Mīmāmsā and Nyāya

48. प्रत्यक्ष व उपमान ही दोन्हीप्रमाणे स्वीकारणारी दर्शने म्हणजे :

(A) चार्वाक व न्याय

(B) बौद्ध व न्याय

(C) योग व न्याय

(D) पूर्वमीमांसा व न्याय

49. The Vedic word Ṛta stands for :

(A) Only cosmic order

(B) Only moral order

(C) Both moral and cosmic order

(D) Weakness of human nature

50. Davidson's solution to mind-body problem is called :

(A) Anomalous Monism

(B) Anomalous Dualism

(C) Absolute Monism

(D) Cartesian Dualism

51. According to Nyāya, Substance Ākāsa is known by :

(A) Verbal testimony

(B) Perception

(C) Intuition

(D) Inference

49. वैदिक ऋत म्हणजे :

(A) केवळ विश्वव्यवस्था

(B) केवळ नीतिव्यवस्था

(C) नीती व विश्वव्यवस्था

(D) मानवी स्वभावाचे दौर्बल्य

50. देहमनाच्या समस्येला डेव्हिडसनने दिलेल्या उत्तराला काय म्हणतात ?

(A) अनियमित एकतत्त्ववाद

(B) अनियमित द्वैतवाद

(C) केवळ एकतत्त्ववाद

(D) देकार्तप्रणित द्वैतवाद

51. न्यायमतानुसार आकाशद्रव्याचे ज्ञान :

(A) शब्द प्रमाणाने होते

(B) प्रत्यक्षाने होते

(C) अंत:प्रज्ञेने होते

(D) अनुमानाने होते

52. If both 'I' and 'O' propositions are false, the truth-value of 'A' and 'E' propositions are respectively :
   (A) Both 'A' and 'E' propositions are false
   (B) 'A' is false but 'E' is true
   (C) 'A' is true but 'E' is false
   (D) Both 'A' and 'E' are true

52. जर 'I' आणि 'O' ही दोन्ही विधाने असत्य असतील, तर 'A' आणि 'E' विधानांचे हे सत्यता मूल्य असेल :
   (A) 'A' आणि 'E' ही दोन्ही असत्य असतील
   (B) 'A' असत्य तर 'E' सत्य असेल
   (C) 'A' सत्य तर 'E' असत्य असेल
   (D) 'A' आणि 'E' दोन्ही सत्य असतील

53. Testimony as a source of valid knowledge (Pramāṇa) is rejected by :
   (A) Sankaracārya
   (B) Mīmāṁsāka
   (C) Nyāya
   (D) Bauddha

53. 'शब्द' प्रमाणाला यथार्थज्ञानाचे साधन (प्रमाण) म्हणून ज्यांनी नाकारले ते आहेत :
   (A) शंकराचार्य
   (B) मीमांसक
   (C) न्याय
   (D) बौद्ध

54. Merleau Ponty upholds that human subjectivity is paradoxical in being both :

(A) Constitutional and constituting

(B) Physical and mental

(C) Intellectual and intuitive

(D) Spatial and temporal

54. मॉर्लि पाँटीने असे मानले की मानवी व्यक्तिनिष्ठता तिच्या पुढील दुहेरी वैशिष्ट्यांमुळे विरोधाभासात्मक असते :

(A) घटनात्मक व घटकात्मक

(B) भौतिक आणि मानसिक

(C) बौद्धिक आणि अंत:प्रेरित

(D) अवकाशीय आणि कालिक

55. Abhihitānvayavāda is the view held by :

(A) Prasastapāda

(B) Kumārila Bhatta

(C) Prabhākara Bhatta

(D) Sabara

55. अभिहितान्वयवादाचा पुरस्कार करणारा तत्त्वज्ञ हे आहे :

(A) प्रशस्तपाद

(B) कुमारिल भट्ट

(C) प्रभाकर भट्ट

(D) शबर

56. The correct sequence of four conditions of an intelligible sentence according to Nyāya is :

(A) Yogyāta , Sannidhi, Tātparya and Ākānksā

(B) Ākānksā , Yogyāta , Sannidhi, and Tātparya

(C) Sannidhi, Yogyāta , Tātparya and Ākānksā

(D) Sannidhi, Tātparya , Ākānksā and Yogyāta

57. Which of the following proposition is *true* ?

The idea of spiritual substance :

(A) is maintained by Berkeley but repudiated by Hume

(B) is maintained by Locke but repudiated by Berkeley

(C) is maintained by both Berkeley and Hume

(D) is maintained by neither Locke nor Berkeley

56. न्यायदर्शनाच्या मते वाक्यार्थबोधाच्या चार अटींचा योग्य क्रम हा आहे :

(A) योग्यता, संन्निधि, तात्पर्य आणि आकांक्षा

(B) आकांक्षा, योग्यता, संन्निधि आणि तात्पर्य

(C) संन्निधि, योग्यता, तात्पर्य आणि आकांक्षा

(D) संन्निधि, तात्पर्य, आकांक्षा आणि योग्यता

57. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

चैतन्यमय द्रव्याची संकल्पना :

(A) बर्कलेने मांडली, परंतु ह्युमने खंडन केले

(B) लॉकने मांडली, परंतु बर्कलेने खंडन केले

(C) बर्कले व ह्यूम ह्या दोघांनीही मांडली

(D) लॉक व बर्कले या दोघांनीही मांडली नाही

58. The enjoyment of fruits of the Karma that *not* yet has been started is called :

(A) Sañcita Karma

(B) Sañcīyamana Karma

(C) Prārabdha Karma

(D) Anārabdha Karma

59. This is *not* a duo related to statements :

(A) A priori — A posteriori

(B) Analytic — Synthetic

(C) Simple — Complex

(D) Empirical — Rational

58. ज्या कर्मांची फळे भोगण्यास अद्याप सुरुवात झाली नाही त्यांना असे म्हणतात :

(A) संचित कर्म

(B) संचियमान कर्म

(C) प्रारब्ध कर्म

(D) अनारब्ध कर्म

59. ही विधानविषयक जोडी **नाही** :

(A) अनुभवपूर्व — अनुभवाधिष्ठीत

(B) विश्लेषक — संश्लेषक

(C) सरल — संकीर्ण

(D) आनुभविक — बौद्धिक

60. Which of the following represents Plato's cardinal virtues ?

(A) Wisdom, Courage, Temperance, Fairness

(B) Wisdom, Courage, Self-control, Fairness

(C) Wisdom, Courage, Temperance, Justice

(D) Wisdom, Valour, Temperance, Justice

61. According to Asatkaryavāda, the effect comes into being on the destruction of :

(A) Anyonyābhāva

(B) Prāgabhāva

(C) Pradhvaṁsābhāva

(D) Atyantābhāva

60. खालीलपैकी कोणते प्रधानगुण प्लेटोने दिले आहेत ?

(A) प्रज्ञा, धैर्य, संयम, रास्तपणा

(B) प्रज्ञा, धैर्य, आत्म-नियमन, रास्तपणा

(C) प्रज्ञा, धैर्य, संयम, न्याय

(D) प्रज्ञा, शौर्य, संयम, न्याय

61. असत्कार्यवादानुसार कार्य अस्तित्वात येताना याचा नाश होतो :

(A) अन्योन्याभाव

(B) प्रागभाव

(C) प्रध्वंसाभाव

(D) अत्यंताभाव

62. Husserl defines phenomenology broadly as :

(A) A realist study of the world

(B) A linguistic study of phenomena

(C) A descriptive analysis of subjective phenomena

(D) A metaphysical analysis of phenomena

63. Which of the following is a prophetic religion ?

(A) Hinduism

(B) Buddhism

(C) Islam

(D) Vedic

62. हुसर्लने मानसघटनावादाची व्याख्या सामान्यत: अशी केली आहे :

(A) जगाचा वास्तववादी अभ्यास

(B) संवृत्तीचा भाषिक अभ्यास

(C) व्यक्तिनिष्ठ संवृत्तीचे विश्लेषण

(D) संवृत्तीचे सत्ताशास्त्रीय विश्लेषण

63. खालीलपैकी कोणता धर्मप्रेषिताचा धर्म आहे ?

(A) हिंदू

(B) बौद्ध

(C) इस्लाम

(D) वेदिक

64. The *correct* symbolization of the following arguments is :

**Argument :** Some propositions are true. Some propositions are both false and ambiguous. Therefore some propositions are either true or ambiguous.

**Symbolization :**

(A) $(\exists x)\ (Px \cdot Tx)$

$(\exists x)\ [Px \supset (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \supset (Tx \vee Ax)]$

(B) $(\exists x)\ (Px \supset Tx)$

$(\exists x)\ [Px \supset (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \supset (Tx \vee Ax)]$

(C) $(\exists x)\ (Px \cdot Tx)$

$(\exists x)\ [Px \cdot (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \cdot (Tx \vee Ax)]$

(D) $(\exists x)\ (Px \cdot Tx)$

$(\exists x)\ [Px \vee (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \vee (Tx \vee Ax)]$

65. The world of experience is the product of māyā which possesses the powers of :

(A) Vikalpa and Dhāraṇā

(B) Āvaraṇa and Vikṣepa

(C) Vikalpa and Vikṣepa

(D) Āvaraṇa and Vikalpa

64. पुढील युक्तिवादाचे **अचूक** चिन्हांकन आहे :

**युक्तिवाद :** काही विधाने सत्य आहेत. काही विधाने असत्य आणि संदिग्ध दोन्ही आहेत. म्हणून काही विधाने एकतर सत्य आहेत किंवा संदिग्ध आहेत :

**चिन्हांकन :**

(A) $(\exists x)\ (Px \cdot Tx)$

$(\exists x)\ [Px \supset (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \supset (Tx \vee Ax)]$

(B) $(\exists x)\ (Px \supset Tx)$

$(\exists x)\ [Px \supset (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \supset (Tx \vee Ax)]$

(C) $(\exists x)\ (Px \cdot Tx)$

$(\exists x)\ [Px \cdot (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \cdot (Tx \vee Ax)]$

(D) $(\exists x)\ (Px \cdot Tx)$

$(\exists x)\ [Px \vee (Fx \cdot Ax)]$

$/ \therefore (\exists x)\ [Px \vee (Tx \vee Ax)]$

65. माया, जी बाह्य विश्वाच्या उत्पत्तीचे कारण आहे, तिच्यात शक्तीयुक्त म्हणजे :

(A) विकल्प व धारणा

(B) आवरण व विक्षेप

(C) विकल्प व विक्षेप

(D) आवरण व विकल्प

66. The correct sequence of three jewels of Jainism is :

(A) Samyaka Darshan, Samyaka Chāritra and Samyaka Jñāna

(B) Samyaka Darshan, Samyaka Jñāna and Samyaka Chāritra

(C) Samyaka Jñāna, Samyaka Darshan and Samyaka Chāritra

(D) Samyaka Darshan, Samyaka Chāritra and Samyaka Karma

66. जैनदर्शनाच्या त्रिरत्नांचा योग्य क्रम असा :

(A) सम्यक् दर्शन, सम्यक् चारित्र व सम्यक् ज्ञान

(B) सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चारित्र

(C) सम्यक् ज्ञान, सम्यक् दर्शन व सम्यक् चारित्र

(D) सम्यक् दर्शन, सम्यक् चारित्र व सम्यक् कर्म

67. Which of the following proposition is *true* ?

(A) Rāmānuja propounds Brahma-pariṇāmavāda

(B) Saṁkara propounds asatkāryavāda

(C) Madhva is a non-dualist

(D) Nimbārka is a dualist

68. The view that all types of Pratyakṣa are nirvikalpaka is upheld by :

(A) Bauddha

(B) Nyāya

(C) Vaiseṣika

(D) Visistādvaita

67. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(A) रामानुज ब्रह्मपरिणामवाद मांडतात

(B) शंकर असत्कार्यवाद मांडतात

(C) मध्व अद्वैती आहेत

(D) निंबार्क द्वैती आहेत

68. 'प्रत्यक्षाचे सर्व प्रकार निर्विकल्पक आहेत' हे मत यांनी धारण केले आहे :

(A) बौद्धांनी

(B) न्यायाने

(C) वैशेषिकांनी

(D) विशिष्टाद्वैताने

69. Which of the following is *true* ?

(A) Nyāya and Buddhists are parataḥ prāmāṇyavādī

(B) Nyāya is parataḥ prāmāṇyavādī and Buddhists are svataḥ prāmāṇyavādī

(C) Nyāya and Mīmāṁsā both are parataḥ prāmāṇyavādī

(D) Mīmāṁsā is svataḥ prāmāṇyavādī and Buddhists are svataḥ aprāmāṇyavādī

70. According to Gandhi '*Sarvadharma Samabhāva*' means :

(A) All religions teach moral values

(B) All religions should be synthesised

(C) There isn't unity of all religions

(D) All religions should be treated equally

69. पुढीलपैकी कुठला पर्याय **अचूक** आहे ?

(A) न्याय व बौद्ध परत:प्रामाण्यवादी आहेत

(B) न्याय परत:प्रामाण्यवादी आहेत व बौद्ध स्वत:प्रामाण्यवादी आहेत

(C) न्याय व मीमांसा दोन्ही परत:प्रामाण्यवादी आहेत

(D) मीमांसा स्वत:प्रामाण्यवादी आहे व बौद्ध स्वत:अप्रामाण्यवादी आहेत

70. गांधीजींच्या मते 'सर्वधर्म समभाव' म्हणजे :

(A) सर्व धर्म नैतिक मूल्यांची शिकवण देतात

(B) सर्वधर्मांचे संश्लेषण झाले पाहिजे

(C) सर्व धर्मांमध्ये एकता नाही

(D) सर्व धर्मांना समानतेने वागविले पाहिजे

71. The standard definition of knowledge explores the following conditions :
(A) belief, certainty, verification
(B) belief, truth, verification
(C) cognition, certainty, verification
(D) belief, truth, justification

72. Habermas characterises the social sciences as :
(A) Non-hermeneutic
(B) Hermeneutic
(C) Double hermeneutic
(D) Quasi hermeneutic

73. The chief exponent of representative realism is :
(A) Locke
(B) Berkeley
(C) Spinoza
(D) Russell

71. ज्ञानाच्या प्रमाणित व्याख्येने स्पष्ट केलेल्या अटी हे आहेत :
(A) धारणा, निश्चितता, प्रचितीक्षमता
(B) धारणा, सत्य, प्रचितीक्षमता
(C) ज्ञान, निश्चितता, प्रचितीक्षमता
(D) धारणा, सत्य, समर्थन

72. हॅबरमासने सामाजिक विज्ञानांचे वैशिष्ट्य असे सांगितले आहे :
(A) न-अन्वयार्थात्मक
(B) अन्वयार्थात्मक
(C) द्वि-अन्वयार्थात्मक
(D) व्याज-अन्वयार्थात्मक

73. प्रातिनिधिक वास्तववादाचा प्रमुख पुरस्कर्ता हे आहे :
(A) लॉक
(B) बर्कले
(C) स्पिनोझा
(D) रसेल

74. Which of the following statements is *incorrect* ?

(A) Karl Popper mentions intuition as a way of knowing

(B) Ayer accepts memory as a source of knowledge

(C) Hume ascribes the highest importance to rational knowledge

(D) Ryle distinguishes between knowing-how and knowing-that

75. According to Jainism real (sat) is :

(A) Permanent and unchangeable

(B) Impermanent

(C) Origination, decay and permanance

(D) Origination and decay

74. पुढीलपैकी **चुकी**चे विधान ओळखा :

(A) कार्ल पॉपरने अंत:प्रज्ञेचा उल्लेख ज्ञानाचे साधन म्हणून केला

(B) एयरने स्मृतीचा ज्ञानाचे साधन म्हणून स्वीकार केला

(C) ह्यूमने बौद्धिक ज्ञानाला सर्वोच्च महत्त्व दिले

(D) राईलने कौशल्यात्मक ज्ञान व तथ्यात्मक ज्ञान यांत फरक केला

75. जैन दर्शनानुसार सत् हे :

(A) नित्य आणि अपरिवर्तनशील आहे

(B) परिवर्तनशील आहे

(C) उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य आहे

(D) उत्पाद आणि व्यययुक्त आहे

**ROUGH WORK**